महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्र. १४७७(२)/२०२१/मुला.का./वीस दिनांक : २७ एप्रिल, २०२३

# -:प्रसिद्धीपत्रक:-

**विषय : राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२१ सुधारित सर्वसाधारण गुणवत्ता यादीबाबत**

संदर्भ : १) पूर्व परीक्षा जाहिरात क्र. १०६/२०२१, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१
२) मुख्य परीक्षा जाहिरात क्र. ३१/२०२२, दिनांक ३० मार्च, २०२२
३) आयोगाचे समक्रमांकाचे प्रसिद्धीपत्रक दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३
४) शासन परिपत्रक इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक १३ मार्च, २०२३
५) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग – राआधो २०२३ /प्र.क्र. ४०/१६-अ, दिनांक २३ मार्च, २०२३

राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२१ च्या मुलाखतीच्या अनुषंगाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली होती.

२. मुलाखतीच्या वेळी विहित कालावधीतील उन्नत व्यक्ती/प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) / अर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाचे (EWS) प्रमाणपत्राअभावी मुलाखतीस प्रवेश नाकारलेल्या तथापि, संदर्भ क्र. ४ व ५ मध्ये नमूद परिपत्रकातील तरतूदीनुसार मुलाखत प्रवेशास पात्र ठरत असलेल्या ६ उमेदवारांना दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी मुलाखतीस बोलविण्यात आले होते. सदर मुलाखतींच्या अनुषंगाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली प्रस्तुत परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी सुधारित करण्यात आली असून सुधारित सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

३. संदर्भ क्र. ३ च्या प्रसिद्धीपत्रकान्वये यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधील १२१ उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेकरिता पसंतीक्रम सादर केला नाही. अशा १२१ उमेदवारांची नावे सदर सुधारित सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधून वगळण्यात आली आहेत. त्यांच्या नावाचा पुढील निकाल प्रक्रियेकरिता विचार करण्यात येणार नाही.

४. दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजीच्या मुलाखतीच्या अनुषंगाने प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचित संवर्ग/ पदासाठी पसंतीक्रम (Preference Number) विकल्प सादर करण्याकरीता सदर उमेदवारांनाच आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES या मेनूमध्ये ‘Post Preference’ वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक २८ एप्रिल २०२३ रोजी ११:०० वाजेपासून दिनांक १ मे, २०२३ रोजी २३:५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

५. उमेदवारांकडून विहित पध्दतीने प्राप्त पसंतीक्रमाच्या आधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-

(१) वेबलिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्व २० संवर्गाकरीता १ ते २० मधील पसंतीक्रम अथवा No Preference’ विकल्प निवडणे अनिवार्य आहे.

(२) अधिसूचित सर्व संवर्गाकरिता/ पदांकरिता १ ते २० मधील पसंतीक्रम निवडणा-या उमेदवारांचा त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार  निवडीकरीता विचार होईल.

(३) अधिसूचित २० संवर्गापैकी/पदापैकी ज्या पदांवरील निवडीकरिता इच्छुक आहे; केवळ त्याच पदाकरिता पसंतीक्रम सादर करावेत. ज्या पदांवरील निवडीकरिता इच्छुक नाही; त्या पदांकरीता 'No Preference' हा विकल्प निवडावा.

(४) संवर्गाचे पसंतीक्रम सादर केल्यानंतर 'Download PDF'  हा पर्याय निवडून उमेदवारास सादर केलेले पसंतीक्रम जतन करून ठेवता येऊ शकतील.

(५) पसंतीक्रम सादर करणारे उमेदवार ज्या संवर्ग /पदांकरीता पसंतीक्रम सादर करतील केवळ त्याच संवर्ग/पदांवरील निवडीकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

(६) विहित कालावधीनंतर संवर्ग/ पदांचे पसंतीक्रम सादर करण्याची अथवा बदलण्याची उमेदवाराची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

६. संवर्ग/पदांचे पसंतीक्रम सादर करण्यास कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

ठिकाण :- नवी मुंबई.

उपसचिव (परिक्षोत्तर-राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग